वंदे मातरम्

शाहिरी .... डफ.

पोवाडा १० वा

# आधुनिक भीष्म

अर्थात्

## बाजी प्रभू देशपांडे यांचा

# पोवाडा


लेखक

शाहीर प्रल्हादराय,

जळगांव पू. खा.



शके १८५६ ] आवृत्ति १ ली [ सन १९३५

किंमत ३ आणे

२२८

# प्रारंभीं

यापूर्वींच ह्या वीर-मणीचें अनेक शाहिरांनीं व इतर कवींनींही गुणगान केलें आहे व ते पुढेंही करतीलच. अशा नररत्नांचा गुणगौरव जो तो त्यास मिळालेल्या माहितीप्रमाणें करीत असतो. त्याचप्रमाणें मींही हा एक प्रयत्न केलेला आहे. तो कितपत साध्य झाला आहे हें ठरविणारे इतिहाससंशोधक ठरवितील पण या पोवाड्यांत कांहीं बोध घेण्यासारखा असेल तर तो कोणता हें ज्याचें त्यास न सांगतां समजण्यासारखें आहे. प्रस्तुत पोवाडा तयार करण्याचे कामीं मीं ज्या ग्रंथांचा आधार घेतला त्यांचा नामनिर्देश न करणें म्हणजे तो एक कृतघ्नपणाच होय म्हणून त्यांचा उल्लेख केल्याशिवाय माझेच्यानें राहवत नाहीं. त्यांपैकीं एकाचें नांव मात्र मला अत्यंत कष्टानें गाळावें लागत आहे अशा एका गृहस्थाचे जुन्या पोवाड्यावरून व दुसरे गृहस्थ म्हणजे "बाजी प्रभू" यांचें चरित्रलेखक रा. रा. वा. स. कुलकर्णी हे होत. या उभयतांचा मी आभारी आहें. त्याचप्रमाणें माझे विनंतीस मान देऊन श्री गोपाल गायन समाजाचे चालक श्री. गो. गो. देसाई यांनीं प्रस्तावना लिहून दिली याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

जळगांव
श्री शिवजयंती
फाल्गुन व॥ ३ शके १८५६

सर्वांचा कृपाभिलाषी
—शाहीर

---

प्रकाशक—**प्र. रं. जामखेडकर**, जळगांव, पू. खा.

मुद्रक—**श्री. र. राजगुरु**, 'राजगुरु आणि कंपनीज् प्रेस,'
५१३ शनिवार, पुणें २.

१२८

# प्रस्तावना

—:०:—

जळगांवचे प्रसिद्ध शाहीर श्री. प्रल्हादराय यांनीं आम्हांस आपला बाजी प्रभूचा पोवाडा म्हणून दाखविला. पोवाड्याचें ध्रुपद, त्यांतील भाषा, प्रास, चालीची योजना व प्रसंगाचीं वर्णनें वगैरे गोष्टी चांगल्या साधल्या आहेत. अशा प्रकारें इतिहासांतील शेंकडों प्रसंगांवर पोवाडे रचून ते जनतेपुढें ठेवावेत अशी श्री. प्रल्हादराय यांची उत्कट इच्छा दिसून आली. आजच्या परिस्थितींत इतिहास नुसता वाचण्यापेक्षां त्यांतील उत्तम असे प्रसंग पोवाड्यांत गुंफून ते डफ-तुणतुण्याच्या साथींत वेळोवेळीं जनतेपुढें गाइले गेले तर लोकशिक्षणाचें कार्य उत्तम होईल यांत शंका नाहीं. श्री. प्रल्हादराय यांचा अशा तऱ्हेचीं काव्यें रचण्यावर व तीं प्रत्यक्ष म्हणण्याचाही अभ्यास फारच चांगला आहे.

ब्राह्मणांनीं डफ-तुणतुणें हातीं घेणें कमीपणा समजला जात असे व शाहीर म्हटला, कीं तो ब्राह्मणेतरच असावयाचा. परंतु गेल्या दहा वर्षांपासून ब्राह्मण शाहीरच चोहींकडे निघून त्यांनीं ऐतिहासिक पोवाड्यांचा प्रचार मोठ्या झपाट्यानें सुरू केला ही मोठी आनंदाची गोष्ट आहे.

अलीकडे शाहिरी काव्यें रचण्यांत व गाण्यांत बरेच दोष दिसून येतात. त्यांत सुधारणा व्हावी अशी प्रल्हादरायांची इच्छा असून त्या दृष्टीनें त्यांचे प्रयत्न चालू असल्याचेंही दिसून आलें. या बाबतींत सर्व शाहिरांस सूचना कराव्याशा वाटतात त्या अशा कीं, पोवाडयाची भाषा स्फूर्तिदायक, सर्व-साधारण लोकांस समजेल अशी असावी. शब्दयोजना व चाली प्रसंगाला अनुरूप अशा असाव्या. ज्या व्यक्तीवर किंवा प्रसंगावर पोवाडा रचावयाचा असेल ती व्यक्ति किंवा तो प्रसंग ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचा असावा. जलप्रलय अगर धरणीकंप हे विषय पोवाडयाचे नव्हेत असें आम्हांस वाटतें. पोवाडे म्हणणारे शाहीर तालस्वर जाणणारे असलेच पाहिजेत. डफतुणतुणें अगर डफाऐवजीं संबळ हींच वाद्यें पोवाडयाचे साथीस असावींत. अलीकडे पुष्कळ ठिकाणीं तालस्वर सोडून पोवाडे म्हटलेले ऐकूं येतात तें इष्ट नाहीं. शाहिरांनीं तालस्वराकडे अवश्य लक्ष दिलें पाहिजे. प्रारंभीं नमनामध्यें

गणपती, सरस्वती अगर फार तर गुरु यांखेरीज इतर माणसांचे नांवांची लांबण लावणें सहसा उचित नव्हे. पण नमन हें शाहीर गं. वि. गोखले अगर प्रल्हादराय यांचेप्रमाणें असावें. प्रल्हादरायांचें नमन उत्कृष्ट आहे. हल्लींचे शाहीर या गोष्टी लक्षांत घेतील तर शाहिरांना योग्य तो मान मिळून शाहिरी कलेचें पाऊल पुढें पडेल.

असो. प्रस्तुत पोवाड्यामध्यें तिसऱ्या चौकांतील मुसलमानी सैन्य निशेंत गर्क झाल्याचें वर्णन व चौथ्या चौकांतील शिवाजी निसटून गेला तो प्रसंग व इतर कांहीं वर्णनें फारच चांगलीं साधलीं असून एकंदरींत सर्वच काव्यसंग्राह्य व प्रशंसनीय आहे. श्री प्रल्हादराय यांचें शाहिरी कला आणि वाङ्मय यांची उन्नति करण्याचें मनोगत, त्यांनीं आपला काव्यें रचण्याचा व म्हणण्याचा व्यासंग असाच सदोदित चालू ठेविल्यास सिद्धीस जाऊन या बाबतींत त्यांना जनतेचा पाठिंबा मिळाल्याशिवाय राहणार नाहीं अशी आमची खात्री आहे. शाहिरी कलेची उन्नति व्हावी ही त्यांची सदिच्छाच त्यांना सर्व प्रकारें यश देईल.

श्रीगोपाल गायन समाज, पुणें.
ता. २१–११–३४

गोविंद गोपाळ देसाई

# बाजी प्रभू देशपांडे

## यांचे पोवाडयांतील कथानक

### चौक १ ला

अफजलखानाचा वध झाल्यावर त्याचे सैन्याचीही दाणादाण झाली व तें सैरावैरा पळतां पळतां जीव बचावून जे लोक विजापुरास जाऊन पोंहोचले त्यांतील मुख्य व्यक्ति म्हणजे अफजलखानाचा मुलगा फाजलखान हा होय. त्यानें आदिलशाही दरबारांत झालेल्या फटफजितीचें वर्णन स्वमुखानें करून आम्ही मोठ्या मुष्किलीनें प्राण बचावून ही बातमी आपणास देण्यास आलों आहों; तसेंच माझे वडील खानसाहेब हे मारले गेले, असें सांगतांच सर्व दरबारास मोठें आश्चर्य वाटून खानासारखा योद्धा जर मारला गेला तर दरबारांतील इतर लोकांची कथा काय! असें प्रत्येकास वाटलें आणि या डोंगरी उंदरानें सिंहासारख्या खानास ठार केलें तर आपल्यासारख्या घुंगुरट्यांची कथा काय! असें वाटून दरबार चिंतातुर झाला. आतां शिवाजीचे पारिपत्यास कोणास पाठवावें याबद्दल खलबत होऊन, स्वारीवर जाण्यास कोणीच तयार होईना. करितां सिद्दी जौहर यास बोलावून निदान त्यास तरी विचारावें म्हणून कर्नाटकांतून मुद्दाम बोलावून आणलें तेव्हां अफजलखानाचा मुलगा फाजलखान म्हणाला मलाही मोहीमेस पाठवावें. पहिल्या खेपेस जरी मी पळून आलों असलों तरी या खेपेस माझे वडिलांचा सूड घेतल्याशिवाय खास परत येणार नाहीं. मग सिद्दीबरोबर भरपूर लावलष्कर देऊन आणि भरविलेल्या दरबारांत मानसन्मान करून त्यास "रणबहादूर" ही पदवी देऊन त्याच वेळेस रवाना केलें. त्या वेळीं सिद्दी म्हणाला कीं, आजपर्यंत मीं रणांगणीं केव्हांही हार खाल्ली नाहीं, करितां शिवाजीस ठार मारून फत्ते करून येतों.

## चौक २ रा

सिद्दी जोहार आपले फौजेसह निघून मजल दरमजल कूच करीत चालला असतां रस्त्यांत जीं गांवें लागतील त्या त्या गांवांत शिरून जाळपोळ करून त्यानें गांवेंच्या गांवें, बेचिराख करून, हिंदूंस त्राहि भगवान करून सोडलें. ही बातमी शिवाजी राजे यांस समजतांच त्यांनीं आपला तळ हलवून पन्हाळगडास राहण्याकरितां गेले, व गडावर युद्धसामुग्री जमा करून आलेल्या प्रसंगास तोंड देण्यास सादर झाले. जोहरालाही शिवाजी पन्हाळगडावर निघून गेला अशी खबर मिळाली. त्यानेंही आपला मोर्चा वळवून पन्हाळगडास वेढा दिला. वेढा देऊन चार महिने झाले तरी दोघांचा उघड उघड सामना होईना. तत्राप नेताजी पालकर हा बाहेरून जोहराचे सैन्यावर वरचेवर अचानक छापे घालून त्यासहि त्राहि भगवान करून त्याची ठिकठिकाणींची रसद मारून त्यास उपद्रव देत असे.

## चौक ३ रा

सिद्दी जोहार आणि फाजलखान यांच्या गोटांत आपआपसांत असे विचार चालले कीं, शिवाजीस धरून नेल्याशिवाय आपणांस गत्यंतर नाहीं. यदाकदाचित् शिवाजी जिवंत हातीं न लागला तर त्यास ठार मारून निघून जाऊं. तसेंच इकडे पन्हाळ्यावर त्याच वेळीं शिवाजीमहाराजांचे अशाच प्रकारचे विचार– त्यांचे सहकारी बाजी देशपांडे, तानाजी, नेताजी वगैरेबरोबर चाल होतेच. तो विचार असा कीं, ह्या लोकांस हूल देऊन आपण येथून निघून गेल्याशिवाय आपणांस पुढें कांहींएक करतां यावयाचें नाहीं. असा आपसांत मनसुबा करून सिद्दीच्या गोटांत दूत पाठविला. त्या दूतानें सिद्दीस कळविलें कीं, शिवाजीमहाराज सर्व किल्ले तुमच्या स्वाधीन करून स्वस्थ बसणार आहेत. पण यांतील एकादा किल्ला आम्हांस राहूं द्यावा. उदईक राजे आपणांकडे येऊन या पुढील आपणांस जे काय बोलणें करावयाचें असेल तें आपणाशीं करतीलच. एवढ्यानेंच सिद्दी गर्वानें बेफाम होऊन दूतास म्हणाला, कीं किल्ले वगैरे कांहीं एक देणार नाहीं. प्रथमतः त्यानें बिनशर्त येथें येऊन काय बोलणें करावयाचें तें करावें; मग आम्हांस काय करणें असेल तें करूं. इतकें ऐकल्यावर दूत निघून गेला. तो गेल्यावर

सिद्दीनें आपल्या सैन्यांतील चौकीपहाऱ्यांची पाहणी करून या आनंदोत्सवानिमित्त सर्व सैन्यास नाच-तमाशे वगैरे करून कुसुंबा पिण्याची परवानगी दिली. साहजिकच याचा परिणाम असा झाला कीं, किल्ल्याच्या वेढ्यांत ढिलाई उत्पन्न होऊन सैन्यासह सर्व पहारेकरी (दारू) कुसुंब्याच्या निशेंत मस्त होऊन ठिकठिकाणीं घोरत पडले. अशा समयीं गडावरून एक हेर येऊन झालेला प्रकार अवलोकन करून पन्हाळगडावर जाऊन त्यानें महाराजांस वर्दी दिली कीं, खालीं सिद्दी जोहारासह सर्व सैन्य या वेळीं बेभान पडलें आहे.

## चौक ४ था

दूताच्या वेषांत शिवाजीमहाराज सिद्दीच्या गोटांत जाऊन आलेले होते आणि वरील बातमी मिळतांच मध्यरात्रीच्या सुमारास पन्हाळगडच्या किल्ल्याचा मुख्य दरवाजा उघडला जाऊन शिवाजीमहाराज बाजी प्रभू व चार हजार भालाइतांसह बाहेर पडले. बाहेर पडतांच तुतारीचा परवल मिळाल्याबरोबर सर्व मराठे वीर घोड्यांस टांच देऊन वायुवेगानें चालले असतां मध्येंच जे कांहीं चौक्या पहारेवाले आडवे आले त्यांस कापून काढून शत्रुसेना तुडवीत निघून गेले. अशा चिकट समयींही निसर्गसुद्धां शिवाजीमहाराजांस सहाय होऊन स्वराज्यस्थापनकर्त्याला कसा मदतनीस झाला तो प्रसंग या चौकांत वर्णन केला आहे.

## चौक ५ वा

शिवाजी निघून गेल्यावर कांहीं वेळानें सिद्दी भानावर येऊन आपले चहूं बाजूंना तारवटलेल्या डोळ्यांनीं पाहात असतांना चौक्यापहाऱ्यांची झालेली वाताहत पाहून चौकशी करतां त्यास असें समजून आलें कीं, मराठे आपणांस दगा देऊन निघून गेल्याचाच हा प्रकार आहे. तेवढ्यांतल्या तेवढ्यांत रणशिंग फुंकुन शक्य तितक्या थोडक्या वेळांत बारा हजार सैन्याची जुळवाजुळव करून त्यानें पाठलागास सुरुवात केली. इकडे शिवाजीमहाराजांनीं घोडे मारतां मारतां उजडण्याचे सुमारास सहज तीसचाळीस मैलांची मजल मारली. पुढें शिवाजी व मागें जोहार असा पळण्याचा क्रम सुरू होता. विशाळगडावर पोंहोचण्यास फक्त तीनच कोसांचा टप्पा राहिला होता. इत-

ज्यांत शत्रुपक्षाचे पाटलागाचा सुगावा त्यांना घोड्याच्या टापांनीं दिला आणि गजखिंडींत शिवाजीराजे व बाजी प्रभू हे विचार करूं लागले कीं, या संकटास आपण कोणत्या तऱ्हेनें तोंड द्यावें, तें बाजी प्रभू तुम्हीच आम्हांस सुचवा.

## चौक ६ वा

बाजी प्रभूंनीं शिवाजीमहाराजांस सल्ला दिला कीं, आपण विशाळगडावर निघून जावें. मी येथें थोडक्या सैन्यानिशीं आपण गडावर पोंहोचेपर्यंत खिंडीचा मार्ग रोखून शत्रु सैन्यास आंत शिरूं देत नाहीं. त्या वेळीं शिवाजीराजे बाजी प्रभूस म्हणाले कीं, मी तुम्हांस सोडून जाण्यास तयार नाहीं. जें काय होणें असेल तें आपणा सर्वांचें होईल. बाजी प्रभू म्हणाले, " मी केलेल्या पातकांचें क्षालन करण्याकरितां येथें राहणारच व परसेवेबद्दल योग्य तें प्रायश्चित्त घेऊन पापांतून मुक्त होणार आहे. यदाकदाचित् मी कामास आलोंच तर मुलाबाळांची काळजी आपणासच आहे. मी जर कामीं आलों तर माझ्यासारखे कैक लोक तुम्हांस मिळून स्वराज्य स्थापण्यास उपयोगी पडतील; पण दैववशात् आपणास कांहीं कमजास्त झालें तर पुढें हा स्वराज्याचा पसारा आवरण्यास एकतरी वीर तयार आहे का याचा विचार आपणच करावा. आणि पुनः पुन्हा विनंति करून शिवाजीराजास जाण्यास त्यानें भाग पाडलें. जातांना सांकेतिक खूण म्हणून गडावर पोंहोचतांच पांच तोफा डागून मला पोंहोचल्याची इशारत द्यावी. खूण मिळेपर्यंत छातीचा कोट करून खिंडीचें संरक्षण काळाच्याही हातून आम्ही करूं, आपण निर्धास्त जावें.

## चौक ७ वा

या पुढील सर्व चौकांचें कथानक एकाच ठिकाणीं देण्याचें योजिलें आहे. कारण या चौकापासून पुढें बाजी प्रभू देशपांडे यांचेबरोबर शत्रूचे गजखिंडींत युद्ध होऊन याच खिंडींत आधुनिक भीष्म वीररत्न बाजी प्रभू देशपांडे यांचा देह कार्यपूर्ति झाल्यानंतर धारातीर्थी पतन पावला म्हणून पृथक् पृथक् देण्याचें प्रयोजन वाटत नाहीं.

शिवाजीराजे गेल्यावर बाजीप्रभूसह मराठे लोक खिंडीचें रक्षण करण्या-

करितां टपून बसलेले आहेत; तोंच गज खिंडीची चढण चढण्याकरितां फाजलखानाचे सैन्यानें सुरुवात केली. इकडे शिवाजीराजांस गड चढतांना पाहून फाजलखान चिडून आपल्या सैन्यास म्हणाला, " अरे पाहतां काय! तो शिवाजी चालला आहे त्यास पकडून ठार करा." असें म्हणतांच एकमेकांत चुरस लागून जो तो पुढें जाण्याचा प्रयत्न करीत असतां एकच गर्दी उसळली. याच धामधुमींत बाजीनें त्यांच्यावर अचानक हल्ला चढविला. हा हल्ला कोण करतो व कोठून करतो याची दखल कोणासच लागेना. इकडे लोक तर पटापट मरून पडतात, कित्येक जागेच्या अभावीं दरींत घोड्यासकट पडून मरूं लागले, अशी स्थिति सिद्दीनें पाहतांच फाजलखानाची निर्भर्त्सना करून म्हणाला, " निष्कारण एक टोळी गारद करवलीस. तोंच फाजलखान चिडून जाऊन ताज्या दमाची दुसरी टोळी घेऊन आला व हल्ला करणारांचा शोध करूं लागला. शोधतां शोधतां त्यास फक्त बाजीसह पांचशें मावळा दिसला. फाजलखानास वाटलें कीं, या लोकांस आपण सहज चिरडून टाकूं, पण याचा परिणाम पुढें काय झाला हें आपणांस पुढें समजून येईलच. मराठे लोक आडोसा सोडून खिंडीच्या मध्यभागीं आपल्या छातीचा कोट करून उभे असून यावनी सेनेस एक तसूभरही पुढें सरकूं देइनात. अशा बिकट पेंचांत जोहाराचें सैन्य सांपडलें असतां त्याचेकडील बरेच लोक कामास येऊन प्रेतांचे ढीगच्याढीग पडूं लागले. ह्या वेळीं जखम्यांची दाद कोण घेणार. अशाच प्रकारें दुसरीही टोळी गारद झाली पण त्या वीररत्नानें त्यास दाद दिली नाहीं. तोंच ताज्या दमाची तिसरी टोळी येऊन थडकली. या वेळीं तर इतकें रणकंदन माजलें कीं, ते वर्णन करणें अशक्य आहे. असा घोर रणसंग्राम चालू असतां दुपारची वेळ झाली. या वेळीं बाजीस द्विधा स्थितींत ( म्हणजे खिंडीचें संरक्षण व विशाळगडची परवल, ) आपलें कर्तव्यकर्म आचरीत असतां त्या सिंहास बऱ्याच जखमा झालेल्या होत्या, इतक्यांत एक गोळी वर्मीं लागून बाजी खालीं कोसळला. तो कोसळतांच मराठयांनीं कच खाऊन पळण्यास सुरुवात केली. अशा मरणोन्मुख स्थितींतही त्यानें आपल्या लोकांस उत्तेजन देऊन खिंड राखण्याचा यत्न केला. वीराचे प्राण जाण्यास फारच त्रास व कष्ट पडूं लागले. प्राण तर कंठगत आलेला व इच्छा तर पुरी होईना; कारण महाराज सुखरूप पोंहोचल्याची खूण त्याला अद्याप मिळाली नव्हती. वास्तव त्याचे

प्राणही प्रतिज्ञापूर्ति केल्याशिवाय भीष्माप्रमाणें देह सोडण्यास तयार होईनात. अशा स्थितींत कांहीं वेळ गेल्यावर खुणेच्या तोफांचा आवाज कानीं येतांच सभोंवार पाहून "मीं आपली प्रतिज्ञा पूर्ण केली आहे" असें महाराजांस कळवा असें सांगून विजयश्री मिळवून आपला प्राण विसर्जन केला आणि म्हणूनच शाहिरांनीं त्यांस आधुनिक भीष्म हें नांव दिलेलें आहे.

त्यानंतर रडतोंडीचे मैदानावर मराठे आणि सिद्दी जोहारचें सैन्य यांत तुंबळ रणकंदन माजून कधींही अपजय न मिळविणाऱ्या जोहारास हात हालवीत तेथून परत फिरावें लागून नामुष्कीनें विजापुरीं जावें लागलें.


# बोलक्या आंकड्यांनीं सिद्ध झालेली गोष्ट!

# कॉमनवेल्थ

## विमा कंपनीची अपूर्व लोकप्रियता

| एप्रिल-अखेर | आलेले विमाअर्ज | पॉलिसी दिल्या | लाइफ फंड | कामाची वाद टक्के |
|---|---|---|---|---|
| १९३० | ११,५९,२५० | ७,०४,२५० | ४४२ | |
| १९३१ | १२,२८,३७५ | ९,१२,३७५ | ११,५०० | ३० |
| १९३२ | १३,०४,००० | १०,५३,७५० | ६२,३९७ | १५ |
| १९३३ | १५,१९,७५० | १२,३५,२५० | १,२४,०३९ | १७ |
| १९३४ | २३,०२,७५० | १८,२७,२५० | २,२९,३४४ | ४८ |

यावरून असें सिद्ध होतें कीं, कॉमनवेल्थ विमा कंपनीनें जुन्या कंपन्या-इतकी खास लोकप्रियता संपादन केलेली आहे. तरी सर्व सोयींनीं युक्त अशा या महाराष्ट्रीय कंपनींतच आपला विमा उतरवावा अशी आपणांस आग्रह-सूचना आहे. एजन्ट पाहिजेत.

भेटा—

**एजन्ट पाहिजेत.**

मेसर्स जामखेडकर आणि सन्स,
स्पेशल आर्गनायझर्स, जळगांव, पू. खा.

जय हिंदमाता

शाहिरी....डफ

# फोकाडा १० का

# आधुनिक भीष्म

अर्थात्

# बाजी प्रभू देशपांडे

लेखकः—शाहीर–प्रल्हादराय

त्या पावनखिंडिचा बाजी। खरा रणगाजी। पडुनिया समरीं। अजरामर किर्ती केली जगतांत। आज कुठें अशा लोकांची दाद। प्रल्हादराय गातो त्याचा जयनाद ॥१॥ ध्रु० ॥ चाल—फाजलखान सिद्दी जोहार । शहाचा हार । खाइना हार । रणावरी खाईना जोहार । विजयश्री घाली सदोदित हार । पण शिवापुढं खालि त्यानं हार । हार खाऊन झाला परिहार । झाला जो हार । अला पालनहार । दिलीस का ऽ ऽ हार ॥ ध्रु० ॥ २ ॥

## चौक १ ला

अफझल्ल्याचा मृत्यु होतां सैन्य पळालें चारी दिशेस । चहुं दिशेला पळून फाजल जाऊन पोंहोचला विजापुरास ॥ विजापूरच्या भरदरबारीं वृत्त सांगतो फाजलखान । खानबहादूर कामीं आले मुकले कित्येक स्वप्राणांस ॥ प्राणहि गेले वित्तही गेलें नेलें त्यानें

सर्वस्वास । सर्वस्वासह ठार बुडविले प्राण आले या डोळ्यांत ॥ डोळ्याशिं डोळा न लावितां मी पळून आलों विजापुरांत । विजापूरच्या बादशहाला खबर देतों दरबारांत ॥ चाल:—सर्वच्या सर्व हादरले । खान कसे मेले । नवल हें झालें । उंदरानें ठार केलं सिंहास । तोबा तोबा कशी गत आम्हांस । धडाकिच भरली समधा शूरांस ॥ भयाभीत झाले सरदार । उतरला नूर । कोणीही शूर । दरबारीं नाहीं मुळीं साह्यास । कोण धाडावा अशा समयास । ध्येनामधीं आला क्रूर जोहार ॥ चाल:—खलबत झालें दरबारीं सिद्दीस बोलवा सत्वरीं । फाजलखान बोले भीतरी । सूडाची इच्छा खरोखरी । पहिल्यांदा घेतली मी हारी । आतां येणार नाहीं माघारी । सूडास सूड घेतला नाहीं जरी । तरी वालीद रुसतील मजवरी । मोहीमेस धाडावं मला तुम्ही बरोबरी ॥ चाल:—बादशहा हुकूम करतो वजीराला । कर्नाटकी वीर । सिद्दी जोहार । बोलवा सत्वर । दरबाराला । दादा रं दाजी जी जी ॥ चाल:—अटीतटीचा बडा दरबार । भरविला त्यानें जोरावर । बडेबडे त्यांत झुंझार । सदरेस होते हजर । आदिलशाहा म्हणे जोहार । दिसतोस शूर सरदार । दरबारीं तूंच खरोखर । शिवाजीस मारण्या ठार । संगें न्यावी फौज भरपूर । दारूगोळा तोफा तलवार । भाले बंदुकी जेजाले तीर । खांडा बलभ बरछा हत्यार । सैफ मांडु जंबिया पट्टा घ्यावी कट्यार ॥ पैशाचा लोटाविन पूर । घेऊन जावे समदे झुंझार । खासे राउत न्यावे भरपूर । पायदळ तसंच पेंढार । बाजारबुणगे आणि लुटार । जंजिऱ्याचा सिद्दी वाडीकर । सावंतांची कुमक येईल म्होरं । शिवाजीचा पुंडावा मोडून यावें सत्वर ॥ शिवाजीस मारिलें जरी । तरी देईन तुम्हा जहागीरी । भरपूर मान दरबारीं । सन्मानास पदवी दिली भारी । बहाल केली रणबहादुरी । सिद्दी फुलुन म्हणे अंतरीं । शिवाजीस

ठार मारून येतों झडकरी ॥ चालः—हार कशी ती ठाऊक नाहीं तो कशी खाईल आज हार । हार खाली वा नाहीं त्यानं कळेल पुढतीं कसं सांगणार ॥ १ ॥

## चौक २ रा

कुच करतो सिद्दी जोहार । खंदे सरदार । होते भरपूर । त्याचे बरोबर ॥ सांडणीस्वार घेऊनशान म्होरं । देती खबर । याच गांवा-वर । तळ पडणार ॥ चालः—पडतांच सैन्याचा तळ । रयत व्याकुळ रडे मुळमुळ । दाण्यागोट्यास्तव लुटती त्यास । शहाचा खजिना घालुन खिशांत । मगरमस्त फिरती समद्या गांवांत ॥ चालः—कस-कसं छळलं त्यानें रयतेस । तेंच सांगतों आतां तुम्हांस । फाकूं नका देऊं चित्त बाजूस । या वक्तास जुलुम त्याचा जाऊन पोचला कळसास ॥ हालवून आपल्या दाढीस । अफिणीची नागिण घशांत । कोंबुनशानी म्हन्ती दोस्तास । नशा नाहीं आला डोळ्यास । बिसमिल्ला चढता हलचास । देखतेही काफरकी जात । घरमें रखो सोलोंकु मत । घसीटकार फत्तर रानको लावो रास्तेमें तुम । लुट लुटाकर साफ करो मकान ह[illegible]म ॥ देखनेमें बढीया औरत । हजिर करो उस्की सुरत । कलमा पढाकर लौंडीकू रखुंगा पास ॥ आडवा आला जरीही त्यास । पारावार नाहीं हालास । सांडसानें तोडुनि मांस । तेच घालती त्याचे तोंडांत । कापून टाकती त्याचे जीभेस जळती मशाल घेऊन हातांत । आग लावती त्याचे खोपट्यास । देती फेकून त्याच आगींत । हें असें कृत्य पाहूनी लाज दैत्यास ॥ चालः—गाई वासरं कापुन चरचरां । खिमा तो करा । लागतो बरा । नाहीं तो बिरयाणी करो यार । नही मुझे गोसका डल्या है प्यार । दावद देकर बुलाव मेरी प्यार । असा तंटा चालतो आपसांत । तोंच होती सर्व वाताहात । दुसरी टोळी लुटून नेती त्यास । खून

करून एकमेकांत । पुन्हा दाखल होती डेऱ्यांत । गांवोगांव नाचत अशी लष्करी शिस्त ॥ चाल:—वर्दी मिळाली शिवसर्जोला जोहार आला मज धरण्यास । वर्दी पोंहोचतां तळ हालवोनी दाखल झाला पन्हाळगडास ॥ पन्हाळगडावरी सैन्य जमवुनि गोफणगुंडे दिले हातांत । हातामध्यें बाण भाले कटीवरी लटके ही समशेर ॥ सांठा केला तलवारी दारुगोळा तो भरपूर । भरपूर होत्या तोफा बंदुका मोर्चे बांधिले बुरजावर ॥ अन्न पाण्याचा सांठा केला बाले किल्यां-तची महामूर । शत्रु आला तरी धावून येथें दाद न देऊं आम्ही रणशूर ॥ चाल:—महाराष्ट्री सह्याद्रीचा तट । त्यावरी तसेच किले बळकट । जरी सिद्दी आला धावून फिरे वणवणा । परि दाद लागेना त्याला पन्हाळास वेढा ॥ वेढा देऊन झाले चार महिने । पहारे चौक्या चहूं बाजूनें । मध्यें किल्ला भोंवतीं जोहार त्याची ती सेना नेताजी घिरट्या घालुन उडवितो फन्ना ॥ फन्ना पाडी नेताजी जरी । होत सैन्य जोहाराचं भारी । त्राही त्राही केलं मराठ्यांनीं जोहार फाजलला । अडवून धरला पेंचांत त्याची केली दैना ॥ चौकाचा भरला आका । दादांनो थांबा सांगन तुम्हां म्होरं । समजेल तुम्हांला सर्व कांहीं जरा ठेरा । नका होऊं उताईळ पैशाचं पाकीट खोला ॥ शाहीरास द्यावा ईनाम । शेला शिरपाव रोकड दाम । नच दिलं शाहीराला कांहीं जोर नच कवणा । परि किर्ती होईल तुमची नांवासी सांगा रे सांगा ॥ २ ॥

## चौक ३ रा

स्वराज्याचा प्राण अडकला । पन्हाळ गडाला । खासा सांपडला । मनामंधीं मांडे खातो जोहार । अफजुलसूत म्हणे हुशियार । आम्हीच शिवभूप जिवंत धरणार ॥ धरून नेऊं त्यास दरबारीं । सैन्याभीतरी । राजमंदीरीं । शिक्षा देऊन करूं त्यास आम्ही ठार ।

नेस्तनाबुद गनिम करून पार। तरी सैन्यासह येथुन हालणार॥ पन्हाळ्याच्या बालेकिल्ल्यांत। चाल्ला खलबत। कोण कोण त्यांत। दादांनो तेंच तुम्हां कळणार। बाजी, तानाजी, नेता सरदार। आणिक उमराव एकांडे स्वार॥ चालः—सर्जा म्हणे तवां मावळ्याला। येढा असा पडला। पुढं काय बोला। कित्येक दिवस वेढा पडणार। अन्नपाणी समूद सरणार। शह पाहिजे त्यास देण्याला। अशा वक्ताला। युगुत कांही बोला॥ कां ऽ शरण जाऊ यवनाला। मागुन माफिला। राखुं राज्याला। कां ऽ तुम्ही कांहीं करणार। वा असेच स्वस्थ बसणार। शिवाजीनें घालता सांकडें। इचार तो पडे। समद्या सैन्याला॥ चालः—इचाराचे वारू भडकले। वायु वेगें चाले। जागेवर आले। इचार कळतांच आनंद मावळ्यांस। गडाखालीं धाडलं त्यांनीं दूतास। जोहारासि सल्ला नीट करण्यास॥ चालः—दिसतांच जोहार हात घातला पट्यास॥ इंगळासारखा लाले लाल रंग आला डोळ्यास॥ भानावर येऊनशान् जोहार करतो जोहारास॥ धीट नीट दूत तो काय बोलला त्यास॥ गडावरून आलों मी सल्ला मामला करण्यास॥ सर्जाचा संदेशा देतों आतां तुम्हांस॥ चालः—ठेवूं नका येढा आतां किल्ल्याला। तमाम दौलत करतों हवाला। भेटुं सावकाश मंग गोटाला। स्वर्ग हा आलाय् जणूं हाताला। असंच वाटलंय् तवां सिद्दीला। किला बिला देणार नाहीं मुळीं अशा धुर्ताला॥ सांगायचं एकचं राह्यलं तुम्हांला। करा शिक्षा लागेल ती मला। सांभाळून घ्यावं आतां पोराला। ईजापुरीं नका नेऊं तुम्ही मला। शहाची धास्ति फार ती मला। विश्वास ठेवून तुम्हावरी स्वस्थ घेतों झोपेला॥ उद्यां राया येईल तुमच्या डेऱ्याला। कांहींबी ठरवून लावा कडेला। असं म्हणूनशान् दादांनो दूत तो गेला॥ चालः—दूत तो ठला शिवसिंहची तो भेटून आला सिद्दीला। खेळ खेळण्या डाव टाकीला अशीच

भुलला पुंगीला ॥ कल्पना यावी कशी सिद्दीला तशीच त्या हो फाजल्ला । गांवलाय उंदीर तडाख्यामंदी बसणार आतां मानगुटीला ॥ मसलत आली फळास आतां हुकूम केला फौजेला । चैनचान ती करून घ्यावी यश देईल मज तो अल्ला ॥ नाच तमाशे सुरू होऊनी दारू आणविलि मजलशीला । पेल्यावरती पेले पिवोनि कित्येक लागले झिंगायला ॥ निशेंत दारूच्या दिसों लागले पधा त्या फाजल्ला । शिवाजी राजा धरूनी नेला कोंडून ठेवला पिंजऱ्यालां ॥ विजापूरला नेऊन त्यासी हजर केला सदरेला । हजर करतां इन्साफ केलाय ठार करा या दुष्टाला ॥ शहान शहानं केला हवालीं सूड बापाचा घेण्याला । राई येवढे तुकडे करूनशान् खाना कोल्ह्या-कुत्र्याला ॥ निशेंत ऐसे इचार चालतां स्वतां लागला घोरायला । कटक तैसेहि घोरूं लागले शुद्ध नाहीं ती कोणाला ॥ किलकिल होऊनी द्वार गडाचे दूत ईतो खबरेला । स्थिती ऐशी ही वेढेवाल्यांची पाहून गेला किल्याला । चौकीवाले मस्त होवोनि जोर चढला मजलशीला । गस्तीवाल्यांसह सैन्यची अवघे पेंगुन पडलें धरणीला ॥ वेढ्यांतील ही खास बातमी हेर देई तो रायाला । चौक लई हा वाढूं लागला बंद करूं या चौकाला ॥ ३ ॥

## चौक ४ था

छद्मवेषानें जरासंधाकडे कृष्णप्रभु तो गेला । तसा शिवाजी छद्मवेषानें भेटून आला सिद्दीला ॥ खलबत होतां संभाषणीं तो तो वळीच पडला मोहाला । मोह पसरिला शिवसर्जानें खेळ दावण्या सिद्दीला ॥ खेळ दावण्या द्वार उघडिलें मध्यरात्रीच्या समयाला । कसा दाविला खेळ शिवानें ऐका तुम्ही या सदरेला॥ बाहेर आले कांहीं भाले शिवभूपही तो आला । बाजीसह चार हजार मावळे घेऊन भाले खांद्याला ॥ वारूवरती भिडतांच स्वारी

शीळ आली ती कानाला । हातांमधूनि–बाण सुटतां कोण आड-विल मग त्याला ॥ असितपक्षीं रजनीनाथ हा उदीत झाला समयाला । प्रतिपदा ती तिथी होती काज पडलें शिवबाला ॥ बिकट समय हा देखून ऐसा कींव आली चंद्राला । शिव-भूपाला साह्य कराया भाव रचितसे गगनाला ॥ नीलवर्ण हें आकाश सारे तोशवी अवघ्या जनतेला । अंबरीं सारे मेघ पसरतां नीलवर्णही तो गेला ॥ तारांगणीच्या तारा लोपल्या न पाहूं म्हणती पृथ्वीला । देवाघरची दौलत सारी क्षणांत गेली बाजूला॥ चार प्रहराची भाव पसरूनी साह्य झाला भूपाला । चराचरही सहायचि झालें धन्य धन्य त्या सर्जाला॥ निःशब्द सारी मही होऊन ओज देतेस शिवबाला। ओजरूपी चक्र सुदर्शन रक्षण करितसे मार्गाला ॥ रातकिड्यांचा किरूर किरूर ध्वनी भीषण दावी भीतीला । काळ बिचारा भिऊन-च गेला तोही लपला बाजूला ॥ चौक्या पहारे तुडावित गेला कापून काढीत गस्तीला । काजवा बिचारा साह्य होऊन उजेड दावितसे रस्त्याला ॥ कित्येक म्हणती निघून गेला कर्म शोभेना हें त्याला । यांत वावगें कायचि केलें दोष कोणाचा तो बोला ॥ जो येतो दुसऱ्यास फसविण्या त्यास कसाही फसवावा । सामदामादिक उपाय योजावा राष्ट्रधर्मची हा वदला ॥ चाल:– धेनु रक्षी जसा गोपाळ । तसा रक्षी शिव भूपाला । जसा कृष्ण दैत्याचा काळ । तसा शिव म्लेंच्छाचा काळ ॥ **मिळवणी:**–– गेला गेला निघोनी गेला दृष्टीपथांतुन गेला पार । राष्ट्ररक्षका सावध होई हुडकित आला तुज जोहार ॥ ४ ॥

## चौक ५ वा

मोह निद्रा संपल्यावर । सिद्दी जोहार । आला भानावर । हळूहळू पाहतां चहुं बाजूस । रखवाळदार राह्यला नाहीं चौकीस ।

निशेमधीं मस्त सारा सैनिक ॥ चडफडून चालला पुढें । रक्ताचे सडे । ठोकरून पडे । मढ्यांचे ढीग, जागजागेस । पहाटेंच थक्क झाला हृदयांत । गनिमानें गारद केलें समद्यास ॥ चाल:— नसानसांतुनी आग भडकली ठोकुन घेई छातीला । अफझल-सुतही जागा होतां बडवुनी घेतो तोंडाला ॥ ठकसेनें मुझे ठका दिया अब क्या कर सक्ते फाजला । क्या हुवा ये कैसा हुवा ये भै कांहां दौडु या अल्ला ॥ शिंग फुंकुनी सैन्य जमविलें बाराहजार ते गुन्तीला । खासे निघाले झुंज झुंजण्या सिद्दी आणि फाजला ॥ घोड्यावरती स्वारी कसोनी समशेर धरली हाताला । उदयोन्मुख त्या स्वराज्या-ची गर्दन चरचर चिरण्याला ॥ मंद वायुच्या शीतल लहरी उदीत करती सर्वांना । किल्किल्, शब्द हे पक्षीमुखांतील मोद देती श्रांतांना ॥ स्वागत करण्या नभीं राजाचे तरूवरी पक्षी तो बसला । गान करोनी तोषविती त्या या या म्हणती उदयाला ॥ ऐशा समयीं शिव चालला दौडत दौडत मार्गाला । झुंजुमुंजु ती प्रभा फांकली तिमिरनाशही तो झाला ॥ दोन प्रहरांमधी तीस मैलांची मजल मारि शिवसर्जा । दिनकर तो उदयाचलिं येतां आनंद झाला रायाला ॥ जगदंबेची कृपा म्हणोनी भीति न उरली आपणाला । तीनच कोसांचा टप्पा राहिला सहजच गाठूं किल्ल्याला ॥ असं म्हणतांच बाजी प्रभुच्या आवाज कानावर तो आला । खाडखाड त्या टाफा वाजती शत्रुच भिडला पाठीला ॥ पुढें धांवती स्वराज्यसेवक स्वराज्य स्थापन करण्याला । मागें दौडती स्वराज्यछेदक गळफांसचि तो देण्याला ॥ पुढें चालला शिव शाहू तो मागें लागला फाजला । शर्त लागली एकमेकांची धरूंच म्हणती सर्जाला ॥ चढण चढतां गजखिंडीची दीस क्रासराभर तो आला । बाजी प्रभु आणि शिवाजीराजे खलबत करिती खिंडीला ॥ येऊन भिडला शत्रु नाजिक क्षणांत

गांठील सर्वांला । सेनासागर अफाट त्याचा त्वरिताचि बुडविल आपणांला ॥ काय करावी युगत याला बाजी हो तुम्ही बोला । बोला बोला सत्वरीं बोला देखुनि ऐशा वक्ताला ॥ चालः— बाजी म्हणे शीवभूपास । चला चला विशाळगडास ॥ चालः— विनवितो बाजी समयास । शिव भूपास । हात छातीस । लावूनी म्हणे निधडा सरदार । कोट छात्यांचा करूनी तय्यार । शर्तीनं राखूं खिंडीचं द्वार ॥ चालः—सर्वांचे प्राण तुम्ही भिती पडली आम्हांस ॥ तुकडे झाले देहाचे तरी नाहीं फ़िरणार ॥ चालः— ऐकुनी अशा शब्दास । नवल भूपास । म्हणे बाजीस । धन्य तुम्ही हिंदभूमीचे प्यार । मुळींच नाहीं येथून आम्ही हालणार । खाश्या तोडीचा करावा इचार ॥ चालः— बाजी म्हणे शिवभूपाला । ऐकावं तुम्ही वचनाला । अधिकार नाहीं हा मजला । उपदेश तुम्हा करण्याला । मजसमान लाखों सेना । बळी दिधली जरी या स्थाना । तरी मोल कसे तव प्राणा । सांगावें आज आम्हांला ॥ वदवे न शब्द वाचेला वदुं कसा अशुभ शब्दाला । पोशिंदा लाखाचा गेला । मग वाली कोण तो उरला । हाल हाल महाराष्ट्राचे । संरले न कसे दैन्याचे । उच्छेदक हे धर्माचे । हरण्यास कोण पाठीला ॥ हा दिवस आज भाग्याचा । उगवला जणूं सोन्याचा । हा देह पुष्ट मम झाला । परकीय करुनी सेवेला । मजसमान पातकी अन्य । दावण्या खरोखरी न्यून्य । पडेलच सदैवची दैन्य । या अशा देशद्रोह्याला ॥ मत्समान या पाप्याला । पाहिजे दंड देहाला । तो समय आज हा आला । किती मानुं धन्य भाग्याला । फेडण्या पांग धर्माचे । आणिक हिंदभूमीचे । स्थापण्या राज्य हिंदुचें । करीनच खुप शर्थेला ॥ तळपतां रणीं मम भाला । दिपवीन सूर्यतेजाला ! । देवेंद्र जरी तो आला । पळवीन खास मी त्याला । जरी काळ सन्मुख आला । फोडीन तयाच्या भा[illegible] ॥ मग काय पाड सिद्दीचा । राखूंच गज-

खिंडीला ॥ ऐकूनी अशा वचनाला । घळघळा पूर डोळ्यांला । आनंद-सागरीं बुडला । बुडुनिया म्हणे बाजीला । धन्य धन्य दास देशाचे । जरी मिळतील या मोलाचे । देशनिष्ठ स्वाभिमानाचे । तरी खास स्थापुं राज्याला ॥ ५ ॥

## चौक ६ वा

जयजयकार झाला समयाला । शिवा म्हणतो पुढं बाजीला । जातोंच आतां किल्ल्याला । पोंहोचल्याची खूण सर्वाला । तोफा डागून देतों तुम्हांला । पांचच वेळां डागीन तोफेला । कडकडून भेटला बाजीला । भेटतांच लागला कानाला । धन्य धन्य तुमचे हिंम्याला । बाजी म्हणतो तवा सर्जाला । तुम्ही लागाच आतां रस्त्याला । तोफा डागा मात्र खूणेला । तोंपर्यंत राखूं खिंडीला । जरी आलों येथ कामाला । पोराबाळांची काळजी आहेच ती तुम्हांला ॥ असं ऐकून सर्जा बोलला । जाणार नाहींच मुळीं किल्ल्याला । बळी देऊं कसा तुम्हाला । बळी देऊन वांचवूं प्राणाला हें शोभत नाहीं आम्हाला । काय म्हणेल जन पाठीला । येथून कसा जाऊं मी बोला । बोलूं नका चकारशब्दाला । दिसतो शत्रु बघा डोळ्याला । क्षण युग भासतें मला । हृदयांत हुंदका दाटला । बोलावें परंतु शब्द फुटेना वाचेला ॥ चालः—काळमुखामंदी देऊन-श्यान मी निघुन चाललों किल्ल्याला । धन्य धन्य त्या बाजी प्रभुला । त्याचे स्वदेशभक्तिला ॥ शब्द मुखांतील शिवाच्या हे धन्य स्वामी-भक्तिला । स्वामीभक्त हे असे लाधले म्हणूनच स्थापितों राज्याला ॥ एक काळ तो ऐसा होता मराठी भाला सळसळला । दाणादाण ती करुन शत्रुची रिपुरक्तानें तो न्हाला ॥ प्राणाहुनी ते प्यार मानिती स्वराज्यस्थापनकर्त्याला । लढत लढण्या तयार होती कर्दनकाळ जरी पुढें आला ॥ **मिळवणी**:—पांचपन्नास लोक मद-

तीला। बाजी खवळला। रोखून खिंडीला। चवताळून सिंह बा ... बाला।
खिंडींत। कित्येक बळि पडतील त्याचे मुखांत। लढाई। चाल:—
चौकांत ॥ ६ ॥
...डास ॥ चाल:—
...प। लावूनी

## चौक ७ वा

शिवाजीची घोडी धोरणी। अती शाहाणी। भाव जाणुनी। वाऱ्या-वाणी लागली पळायाला। बारगीर लागले कुचमुचायला। पळतांना नाकीं दम आला। ईस पळामंधीं गाठलं दाराला। गडाचीच चढण चढुं लागला। चढतांना यवन बघ्तो त्याला। इदर क्या देखो देखो वो चला। दौडकर पकडो करो तुम हल्ला। थयथया स्वार कुदूं लागला। मैं पकडुं गा इन्शा अल्ला। म्हणून शान टांच देती घोड्याला। ऐक व्हयर दादा दादा र दाऽदा जी ॥ ७॥

## चौक ८ वा

खिंडीची चढतां चढण। लईच अडचण। नाहीं मैदान। जोडीलाच फक्त वाट जाण्याला। धडपडत लागले तवा मार्गाला। वरनं बाजीनं हल्ला केला। बाणांचा वर्षाव सुरू झाला। सण्‌ण्‌ आवाज येतो कानाला। वर्मीच तीर लागती तवा घोड्याला। धाड धाड स्वार कोसळूं लागला। एक पडतांच दुसरा पडला। कैक स्वार मेलाच जागचे जागेला। इकडतिकड बघतोया फाजल्ला। धाड पडलि कोठून खिंडीला। दिसेना कोणी कसा डोळ्याला। निम्मी फौज गारद झाली जागेला। ऐक व्हयर दादा ऽ ऽ ॥ ८ ॥

## चौक ९ वा

सळसळून साप ते जहरी। बाण विषारी। घुसून अंतरीं। गड-बडा लोळती कितीक धरणीला। कोसळून पडले कितीक दऽरीला चडफडून शोधशोधतो फाजल्ला। कुठूनशान सैतान मंदींच घुसला।

गनिमी काव्यानें लढनेवाला। शोधुं कसा त्यास आतां मी अल्ला। सुभेदार टाकून बोल्ती त्याला। शब्द ऐकतांच क्रोध भडकला। बेधडक घुसला त्याच खिंडीला। शोधून पाहतांच चहूंबाजुला। दरीचा वाघ नजर पडला। टरटरा लागली इजार फाटायला। वळवतां तोंड दुसऱ्या बाजुला। मूठभर पाह्मलं त्यान कटकाला। मनामंदीं इस्मय लईच केला। कळ्ळया माग आतां बाणांचा। चिरडूनच टाकीन समघा मावळ्यांला। जात्यात कस बघतों आपल्या घराला। सूडाची धुंद आली डोळ्याला। चिङ्घूनशान् आणतो दुसऱ्या टोळीला। निकराचा हल्ला त्यानं केला। ऐका व्हय र दादा ऽ ऽ ॥ ९ ॥

## चौक १० वा

बाजीच्या संगती ईर। पन्नास व्हत सारं। खिंडीचं दार। अडवून धरतो धिप्पाड। खिंड जोडितो जणूं तो पहाड। त्याच्यापुढं काय शत्रूची चाड। कुत्र्यावानी नव्हता मुळीं खादाड। मराठमोळ्याची होती त्यास चाड। नामधारी नव्हता मराठा तो भ्याड। देशभक्तीचं व्हत त्याला व्याड। आर बघतां काय चला घालूं या धाड। मंधींच फाजला करतो धडपड। चढो चढो चढो चलो धडधड। तलवार भाल्यांचा आवाज खडखड। जणूं तो मेघ करतो गडगड। मेलों मेलों मेलों म्हणती भडभड। प्रेतांचे ढीग पडती फडफड। मुंडके गडगडत जाती गडगड। ऊर पिट्टून घेती आपला तडातड। आलों कुठुन जागा फार खडतर। ऐका व्हय, र दादा ऽ जी जी ॥ १० ॥

## चौक ११ वा

काळाची फिरता नजर। झाला हाहा:कार। कितीक ते ईर। पटपटा कवटाळिती मरणाला। कैकांचा हातपाय तुटला। कैचांचा चेंदामेंदा झाला। पाट असुदाचा वाहूं लागला। मांसाचा गारा

तेथें झाला। कैकांच्या मुंड्या उडति गगनाला। गमतो चेंडुचा डाव चालला। कां कुणी फुलं उडवितो रस्त्याला। दीनदीन बोलूनच ते बोलाला। चेव आणती आपल्या सैन्याला। ठायीं रणरंग उसळूं लागला। कैकांचा मेंदू बाहेर आला। कैकांचे डोळे सोडती जागेला। हात हात बाहेर जिभल्या आल्या। रक्ताचा कारंजाच उसळला। फवारे उडती चहूंबाजुला। दृश्य तें बघवेना डोळ्याला। विवळती कैक जागचे जागेला। मागताती पाणी कैक पिण्याला। पाणी पाणी म्हणून सोडती जीवाला। जखमांची दाद नव्हती कोणाला। दाद कोण घेतो असल्या वक्ताला। एकांदा अर्धा मेला झाला। दडपण पडतांच तोही मेला। फाजला आणतो तिसऱ्या टोळीला। ऐक व्हयर दादा दादार दा ऽ जी जी ॥ ११ ॥

## चौक १२ वा

बाजीची खरी बहादूरी। घेउनी बरोबरी। मावळे झडकरी। तय्यार पुन्हा झुंज झुंजण्याला। हरहर महादेव गर्जला। दऱ्याखोऱ्यांत आवाज घुमला। म्हणती दऱ्याखोऱ्या महादेवाला। जाऊन पुढं धरा म्हणतों शिव्याला। जाऊं देईना बाजी पुढल्याला। अटोकाट यत्न त्यानं केला। पण एक चिंता लागली बाजीला। तीच चिंता जाळी त्याच देहाला। असा कोणता घोर लागला बाजीला। काय बोलतो ऐका कानाला। भर दोहोपाराचा वखूत झाला। राया कसा पोंचला नाहीं किल्ल्याला। तीनतीनदां पाहून त्याच बाजूला। धावा मनामधींच सुरू केला। अंबाबाई साह्य होई लेंकराला। राया सुखरूप पोंहोचो किल्ल्याला। हिच एक आस आहे ती मला। अंबाबाई पाव याच वक्ताला। एवढंच मागणं मागतों मी तुला। अन् तूं पुरवावं माझ्या हेतूला। असं विनवितो अंबाबाईला। ऐका व्हयर दादा दादार ऽ जी जी ॥ १२ ॥

## चौक १३ वा

सूं सूं करित गोळी ती आली। छातींत रुतली। हाय त्या कार्ली। पडलाच बाजी तवा धरणीला। मरनाचा इळखा त्याला पडला। एकच एक ध्यान त्याला। तोफ कां डागली नाहीं किल्ल्याला। हिकडं काय परकार सुरू झाला। सोडूनशान मावळे ते हिमतीला। पळण्याचा माग सोधुं लागला। खवळून बाजी तो समयाला। पडल्या पडल्या बोलला काय कटकाला। हिजड्यावानी पळूं काय लागला। वठावर मिशा बाळगायला। लाज नाहीं कशी र तुम्हांला। ईरसरीनं सोडलं र तुम्हांला। भरा रे बांगड्याच हाताला। लुगडंच नेसा र समयाला। मर्दाचे मुर्दाड कसे बनला। कांहीं तरी लाज धरारे जीवाला। पळून काय चालल्यात घराला म्होरक्या जरी जखमी येथ झाला। तरी का सोडतां र हिमतीला ?। एकेक इर बाजिभासूवा त्याला। आईबहिनीचा इचार काय केला। वरती [illegible] नेऊन द्याच त्येला। कव्हां तरी मरन येनार मर्दाला। लढुनशान मेलात जाल स्वर्गाला। पळूनशान् जाल घोर नरकाला। वाडवाडिल हसतील मंग सर्गाला। षंढ पोटीं आला र जन्माला। थुकतील तुमच्यार जिनगानीला। बोल ऐकतांच मावळा उलटला। फुरफूरून बाहु क्रोध भडकला। भडूकतांच हात घातला पट्टयाला। ऐका व्हय र दादा दादा र जी जी ॥ १३ ॥

## चौक १४

उलटतांच मावळे वीर। शत्रूसी मार। दिला भरपूर। खबर नाहीं मुळीं एकमेकांस। कोन कोनाचा कवा कापला। आपपर-भाव सारा गेला। रामराम कितीक म्हणती शेवटाला। मुडद्यांचा खचच खच पडला। कैक तय्यार होऊन मरणाला। लखलखविती तरवारभाला। होतो कडकडाट जणू मेघांचा। शस्त्रांतून ठिणग्या गळूं

लागल्या । तलवार ढालीचा चुरा झाला । मध्यांमधीं पडतो जाऊन भरतीला । पूर रक्ताचा वाहूं लागला । हाडक लोळत्याती जागजागेला । कवड्यांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या । थयथया काळ नाचूं लागला । झटपट घालून फांसाला । सपासपा मारितो कटकाला । मेजवानी देतोंय गिधाडाला । चैन ती झालि कोल्होबा दादाला । आन् कोन राह्यला कोन मेला । दाद नाहीं मुळींच सुभेदाराला । यवन रेटत्याती पुढं जाण्याला । पुढचा मरतांच मागचा सरकला । वाट कुठं मिळती पुढं जाण्याला । मार्ग खिंडीचा रोखून धरला । जाऊं नाहीं दिलं पुढं सिद्दीला । ऐका व्हय र दादा० ऽ जी ॥ १४ ॥

## चौक १५ वा

बाजीचा जीव तळमळला । पहा जाण्याला । ऐन वक्ताला एक घोर लागला तवा बाजीला । डोळ्यांमंदीं प्राण त्याचा आडकला घुटमळ्ळाय जीव जाण्याला । तसाच पाहतो त्याच किल्ल्याला । अजून तोफेचा बार नाहीं झाला । म्हणूनच दुःख त्याचें चित्ताला पोंचावा शिवबाराया किल्ल्याला । हीच एक आस व्हती ती त्याला खुशाल मग मरण येवो देहाला । काळ ओढितो बाजी नेण्याला । ओढिते इच्छाशक्ति बाजीला । दोघांचा असा झगडा चालला । बघावं इजय मिळतो कोणाला । ईच्छेनेंच भीष्माचार्य तो गेला । असाच दाखला आहे भारताला । तोच भीष्म पुरविल हेतुला ऐक व्हय र दादा ॥ १५ ॥

## चौक १६ वा

धुम धडड ऽ ऽ बार तो झाला । पांच वेळेला । कानांवर आला । पोंहोचल्याची खूण मिळली बाजीला । खूण मिळतांच

आनंद जाहला । न्याहाळून पहातो चहूं बाजुला । मंग काय बोल-लाय कटकाला । देशाच्या कामीं देह पडला । हिंदमातेचा पांग फेडला । खादलंय होतं यवनाच्या अन्नाला । तेंच पाप होतं माझ्या माथ्याला । प्राण देऊन फेडतों मी पापाला । सार्थक झालं या जन्माला । असंच सांगावं तुम्ही राजयाला । इजयश्री घेऊन आली माळेला । फुलं मुंडक्यांची गुंफुनी तिला । उभी ती खिंडीच्या मध्याला । अन् माळ घालावी कोणाच्या गळा । इचार असा पडला तवा देविला । बाजीच्या पाहून देशभक्तीला । तिनें माळ घातली बाजिच्या गळा । घालतांच माळ बाजीच्या गळा । घणघण घंटा-नाद झाला । वरनं सुमनांचा वर्षाव झाला । जय मिळवून गज-खिंडीला । बाजी सर्गात निघून गेला । व्हत त्याला इमान बसायाला । धारकरी होतेच संगतीला । अखंडच मिळविल तो कीर्तीला । प्रल्हादराय म्हणतो जयजयकार बोला । ऐक० व्हय० ॥ १६ ॥

## चौक १७ वा

बाजीनें केली बहादुरी । तेथें खरोखरी । खिंडीभीतरीं । स्वराज्याचा पाया त्यानं भरला । रगत-मांसाचा गारा केला । प[illegible]मधीं कितीक घातले भरतीला । आतां कसं देऊं त्याच्या गणतीला । भरुनशान वरती पाया आला । जोत्यावर चिरा जोडला देहाचा । करूनशान चपळाई वखुताला । घेऊनशान बाजीच्या मुर्दाला । किल्ल्यावरी मावळा निघून गेला ॥ दादार ऽऽ जी जी ॥ चाल:—पाहूनि बाजीच्या देहाला । दु:ख तें झालें शिवबाला । मजवरी तुम्ही कां रुसला । सोडूनी आलों तुम्हाला । रुसलेच म्हणुनी अबोला । किती समजाऊं तुम्हांला । सोडणार नाहीं मी तुजला । बोलावे चार शब्दांला ॥ राष्ट्रीय सेनानी गेला । बोल तो खरोखर केला । मी शोधुं कुठें बाजीला । सांगावं तुम्हीं तें मजला ।

कंठांतील मणी हा गळला । चोरांनीं त्यास पळविला । सूडच योग्य या काला । घेउनी कापूं शत्रुला (करा त्वरा निघा युद्धाला) ॥ हा भीष्म आधुनिक झाला । इच्छामरणीच हाही मेला । खिंडींत ठेवी देहाला । पावनखिंड म्हणा हो इजला । रडतोंडीचेच मैदानीं । शत्रु ते काढि कापोनी । मग सिद्दी आणि फाजल्ला । सोडूनी समरकर्माला । लागुनी डाग तो त्याला । अपयश घेऊनी गेला ॥ जी जी ॥ मिळवणी:—नरसिंह सिंह रणधीर । धन्य नरवीर । बाजी सरदार । शिकवूनी देशभक्ती आपणांस । पाणि दावील फिरंगाच त्यास । शाहीर वंदितो राष्ट्रभक्तास ॥

२५२

समाप्त.